ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958
YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal
January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# स्टार्टअप व्यवसायाचे भारतातील योगदान

**डॉ. गोरखनाथ वाकळे[1], श्री. गणेश मच्छिंद्र चोर[2]**

*मार्गदर्शक, अर्थशास्त्र संशोधन केंद्र व पदव्युत्तर विभाग*
*कै. बिदुरामराव देशमुख कला व वाणिज्य,विज्ञान महिला महाविद्यालय नाशिक रोड ,नाशिक*
*संशोधक विद्यार्थी, पदव्युत्तर अर्थशास्त्र संशोधन केंद्र*
*सहकार महर्षी भाऊसाहेब सतुजी थोरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, संगमनेर*
*जिल्हा- अहमदनगर.*
***Corresponding Author:* डॉ. गोरखनाथ वाकळे**

**DOI - 10.5281/zenodo.14875089**

**प्रस्तावना:**

स्टार्टअप म्हणजे 'उद्‌मारंभ' या संकल्पनेनं गेल्या दशकभरात तरुणांना मोठ्या प्रमाणात आकर्षित केले असून या संकल्पनेने उद्योजकतेची परिभाषा बदलली आहे.वेबस्टरच्या कोषाप्रमाणे 'एक ठराविक गती देण्यासाठी केलेली कृती किंवा प्रक्रिया असा स्टार्टअपचा अर्थ स्पष्ट केला आहे.थोडक्यात असे म्हणता येईल की,नवीन कल्पनेवर आधारित कोणताही व्यवसाय कल्पनेची निर्मिती पासून ते प्रत्यक्षात येईपर्यंत त्याचा प्रवास किंवा प्रक्रिया म्हणजे स्टार्टअप होय. स्टार्टअपची सुरुवात कधी झाली हे सांगणे कधी झाली हे सांगणे कठीण असून साधारणत 'सिलिकॉन व्हली फिव्हर' नावाच्या पुस्तकात स्टार्टअपची उत्पती १९७६ मध्ये झाली असल्याचे म्हटले आहे.तर स्टार्टअप हा शब्द प्रथम १९७६ मध्ये फोर्सबच्या एका लेखात वापरला गेला होता.

"जेव्हा एखादा व्यवसाय सुरु केला जातो तेव्हा त्याला बाजारपेठेत स्वत:ला योग्यरीत्या स्थापित करण्यासाठी थोडा वेळ लागतो .या काळात सरकार त्या नवीन उद्योगाला करात विशेष सूट देते जेणेकरून ते बाजारातील स्पर्धेत टिकू शकेल,या उद्योगाला स्टार्टअप असे म्हणतात. स्टार्टअपचा जर विचार केला असता असे लक्षात येते की,बहुतांश स्टार्टअप हे स्वत:च्या वैयक्तिक अडचणीतून मार्ग काढण्यासाठी ,सामाजिक गरजेतून व समाजाचे ऋण फेडण्यासाठीच्या भावनेतून निर्माण झालेले आहेत.

भारत सरकारने २०१६ मध्ये 'स्टार्टअप इंडिया'या उपक्रमाची सुरुवात केली, स्टार्टअपला प्रोत्साहन देणे,रोजगार निर्मिती आणि संपत्ती निर्माण करणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.आज जगभरातील स्टार्टअपची तिसरी मोठी संख्या भारतात आहे.तरुणांमध्ये स्टार्टअप विषयी विशेष लोकप्रियता निर्माण होण्यामागे तंत्रज्ञानातील प्रगती,उद्योगपूरक वातावरण,सहजतेने होणारा पतपुरवठा,ग्राहकाचा पाठिंबा या गोष्टी उपयुक्त ठरत आहेत. भारतात सुरुवातीच्या काळात पेटीएम, फ्लिपकार्ट, झोमॅतो, ओला, फिट यांसारखे स्टार्टअप पुढे आले.त्याची प्रेरणा घेऊन आजमितीस मोठ्या प्रमाणात नवीन स्टार्टअप निर्माण झाले आहेत.

स्टार्टअप उपक्रमाचा सर्वाधिक वाटा आहे.या उपक्रमामध्ये मैदानी खेळाचे महत्व वाढविणारा स्टार्टअप,कॉम्प्युटर घेण्यासाठी मदत करणारा स्टार्टअप,ज्ञानदानाचा सेवा प्राप्त करून देणारा स्टार्टअप,शहर सुधारणेचे व्यासपीठ म्हणून पुढे आलेला स्टार्टअप,कचऱ्याचा पुनर्वापर करण्यासाठी मदत करणारा स्टार्टअप,पर्यावरणपूरक चुलींची निर्मिती करणारा स्टार्टअप या उपक्रमाची उदाहरणे सांगता येतात .

**शोधनिबंधाची उदिष्टे:**

१. भारतातील स्टार्टअप व्यवसायाचे योगदान अभ्यासणे.

२. स्टार्टअप व्यवसायाच्या गुंतवणूकीचा अभ्यास करणे.

### तथ्य संकलन:

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये प्रकाशित व अप्रकाशित साहित्य उपयोगात आणले आहे. दुय्यम साधनसामग्रीमध्ये संदर्भ ग्रंथ,पुस्तके, मासिके, वर्तमानप्रत्रे, इंटरनेट इत्यादी यांचा आधार घेतला आहे.

### स्टार्टअपमधील क्षेत्रनिहाय गुंतवणूक रक्कम:

स्टार्टअप व्यवसायामध्ये गुंतवणूकीत वाढ होत असताना दिसून येत आहे.स्टार्ट अपमधील क्षेत्रनिहाय गुंतवणूक खालील तक्त्याच्या आधारे अधिक स्पष्ट होते.

**तक्ता क्र.१.१ : क्षेत्रनिहाय गुंतवणूक रक्कम**

| अ.नु. | गुंतवणूक क्षेत्रे | गुंतवणूक रक्कम (टक्केवारीमध्ये) |
|---|---|---|
| १ | ग्राहक सेवा | २.८३ % |
| २ | इ –कॉमर्स | ५.६५ % |
| ३ | ट्रान्सपोर्ट | ४.८५ % |
| ४ | रिअल इस्टेट | ९.०७ % |
| ५ | मनोरंजन | ८.७४ % |
| ६ | आरोग्य | ९.३७ % |
| ७ | इतर | ६.५५ % |

**Source: Indian Tech startup funding Report Q1 2018**

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की,स्टार्ट अपमध्ये विविध क्षेत्रात गुतंवणूक होत असताना दिसून येते.यामध्ये ग्राहक सेवा २.८३% ,इ-कॉमर्स ५.६५%,ट्रान्सपोर्ट व्यवसायामध्ये ४.८५%,रिअल इस्टेटमध्ये ९.०७%,मनोरंजन ८.७४%,आरोग्य सेवेमध्ये ९.३७% आणि इतर व्यवसायामध्ये ६.५५% गुंतवणूक झालेली आहे हे लक्षात येते.

### स्टार्टअपमधील शहरनिहाय गुंतवणूक रक्कम:

स्टार्टअप व्यवसायामध्ये गुतंवणूकीत वाढ होत असताना शहरामध्ये गुंतवणूक होत असताना दिसून येत आहे. हे खालील तक्त्यावरून अधिक स्पष्ट होते.

**तक्ता क्र.१.२: शहरनिहाय गुंतवणूक रक्कम**

| अ.नु. | शहरे | गुतंवणूक रक्कम (टक्केवारीमध्ये) |
|---|---|---|
| १ | हैदराबाद | १.२६ % |
| २ | पुणे | ८.८६ % |
| ३ | चेन्नई | १२.२३ % |
| ४ | मुंबई | १४.५९ % |
| ५ | दिल्ली एनसीआर | १९.५५ % |
| ६ | अहमदाबाद | ९.०४ % |
| ७ | इतर | ०.५० % |

**Source: Indian Tech startup funding Report Q1 2018**

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की,स्टार्टअप व्यवसायामुळे शहरामध्ये देखील गुंतवणूक होत असताना दिसते आहे. यामध्ये हैदराबाद १.२६ % ,पुणे ८.८६ %, चेन्नई १२.२३ % ,मुंबई १४.५९ %, दिल्ली एनसीआर १९.५५ %, अहमदाबाद ९.०४ %, इतर ०.५० % इत्यादी या शहरामध्ये गुंतवणूक झालेली दिसून येते.

**निष्कर्ष** :

1. स्टार्ट अप व्यवसायामुळे क्षेत्रनिहाय गुतंवणूकीमध्ये वाढ झाली आहे.
2. स्टार्ट अप व्यवसायामुळे शहरनिहाय गुंतवणूकीमध्ये वाढ झाली आहे.
3. या व्यवसायामुळे रोजगानिर्मितीत वाढ झाली आहे.
4. स्टार्ट अपमुळे देशातील व्यापारामध्ये वाढ झाली आहे.

**सारांश :**

आजच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात स्टार्टअप व्यवसाय झपाट्याने विकसित होत आहे. देशातील रोजगार निर्मितीमध्ये वाढ होऊन देशातील तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण होत आहे. कचऱ्याचा पुनर्वापर करणे, पर्यावरणपूरक चुलींची निर्मिती करणे या उपक्रमामुळे पर्यावरण विषयक जागृती निर्माण होऊन पर्यावरणीय प्रदूषणाविषयी जागरूकता निर्माण होत आहे.

**संदर्भसूची:**

१. आगलावे प्रदिप ( जानेवारी २०००) “सामाजिक पध्दती शास्त्र व तंत्रे”, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर पान न.-१८१-१८२

२. डॉ.कुदनर चांगदेव किसन & प्रा.वेताळ प्रदिप उत्तम (फेब्रुवारी २०२२) “जेनेरिक इलेक्टिव्ह कोर्स” ,रंगराव पाटील प्रशांत पब्लिकेशन ३,जळगाव

३. Indian Tech startup funding Report Q1 2018

४. https://www.startupindia.gov.in/

५. https://www.makeinindia.com